## नियमित दिवाणी दावा क्र.३२६/२०१४ मधील अर्ज नि.क्र.४८ वरील आदेश

**CNRMHSN06001372-2014**

१. प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे. वादीचा अर्ज व त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे वाचले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादीच्या अर्जामधील कथन असे की, दावा अतिक्रमित मिळकतीचा मालकी हक्काने कब्जा मिळणेसाठी व निरंतर ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. दावा दाखल करतेवेळी प्रतिवादी क्र.१ श्री. विश्वजीत जयसिंग गायकवाड हे अज्ञान असल्यामुळे त्यांचेतर्फे अ.पा.क. म्हणुन त्यांची आजी सौ. पुष्पावती चंद्रकांत पाटील यांना पक्षकार करुन दावेकामी समाविष्ठ केले होते व आहे. वादी यांना मिळालेल्या माहितीनुसार प्रतिवादी क्र.१ हे सज्ञान झाले आहेत. वादींनी दावा मथळयामध्ये प्रतिवादी क्र.१ यांचे नावांतर वय वर्षे–१२ ऐवजी वय वर्षे– २१, व्यवसाय–शिक्षण ऐवजी व्यवसाय–शेती अशी दुरुस्ती होवुन मिळण्याकरीता विनंती केली आहे. अर्ज मंजुर केल्यास दाव्याच्या मूळ स्वरुपामध्ये अथवा वादींच्या मागणीमध्ये कोणताही बदल होणार नाही. सबब त्यांनी दुरुस्तीस परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र.२ यांनी नि.क्र.५३ कडे त्यांचे म्हणणे दाखल करुन जोरदार विरोध दर्शवला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र.१ हे अज्ञान आहेत किंवा सज्ञान आहेत याबाबत त्यांचा जन्माचा दाखला किंवा जन्म तारीख नमुद असलेला सरकारी कागद दाखल केलेला नाही. प्रतिवादी क्र.१ अज्ञान आहेत किंवा सज्ञान झालेले आहेत, याबाबत किंवा प्रस्तुत दावा दुरुस्ती अर्जाची नोटिस प्रतिवादी क्र.१ यांना किंवा त्यांचेतर्फे संभाव्य अ.पा.क. इष्ट मित्र जनक आई यांना रा.पुणे येथील पत्त्यावर काढण्यात यावी व त्यानंतरच प्रस्तुत अर्जाचा विचार करण्यात यावा. सबब त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. वादीने अर्जातील कथने शपथेवर सांगितलेली आहेत. प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमित मिळकतीचा मालकी हक्काने कब्जा मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादीने प्रस्तुत अर्जाव्दारे प्रतिवादी क्र.१ हा सज्ञान झाल्याबाबत त्याचे वय–२१ वर्षे व व्यवसाय–शेती अशी दुरुस्ती होवुन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. प्रस्तुत अर्जाव्दारे वादी करु इच्छीत असलेली दुरुस्ती ही अत्यंत तांत्रीक स्वरुपाची आहे. दुरुस्ती करण्यास वादीस परवानगी दिल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. प्रस्तुत दाव्यात अद्याप संपरिक्षेला सुरुवात झालेली नाही. तथापि, अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. दुरुस्ती नंतर कैफियत देवुन वादीची कथने आव्हानित करावयाची संधी त्यांना असणार आहे. म्हणुन अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादीने अर्जात मागणी केलेली दुरुस्ती विहित मुदतीत करुन घ्यावी व दुरुस्ती प्रत अभिलेखावर दाखल करावी.

SWATI BHASKAR NAIKNAVARE GARAD
Digitally signed by SWATI BHASKAR NAIKNAVARE GARAD
Date: 2022.10.10 15:46:35 +0530

मिरज. **(स्वाती भा. नाईकनवरे–गरड)**

दि. ०७/१०/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज.

C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | S. K. Jadhav, Grade-3 |
| Court. | : | Jt. Civil Judge,Jr.Dn.,Miraj |
| Date. | : | 07.10.2022. |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 07.10.2022. |
| Order uploaded on. | : | 10.10.2022. |